0068603

FORM-1A

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. 22 वर्ष Year 2023 दिनांक Date 12/04/2023

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रति. अधि. १९८८ कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day दि. १२/०४/२०२३ Date from रोजी Time ११.२० वा. ते Date to १३.१२ वा. पर्यंत Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ११/०४/२०२३ वेळ Time १२.०० वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ........ तारीख Date ........ वेळ Time ........

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तरेस ७ कि.मी. बीट / चौकीचे नाव व क्र.
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name घनकचरा व्यवस्थापन, शिवाजीनगर ऑफिस क्र. १,
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place बृहन्मुंबई महानगर पालिका (एम पूर्व वार्ड), गोवंडी, मुंबई
   (c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........
   In case, outside the limit of this Police Station

6. तक्रारदार / खबर देणाऱ्याचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री जमील खान
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री [illegible] खान
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४८ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८२९३००२३६ [illegible]
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation व्यवसाय
   (g) धर्म Religion मुस्लिम जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : गल्ली / वार्ड नं. Ward प्लॉट नं. ३६, ... रोड नं. ०४, शिवाजीनगर,
   रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place गोवंडी गाव Village मुं. ४३ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

श्री. अशोक लालु जाधव, बौद्ध, ५६ वर्षे, लोकसेवक - कनिष्ठ आवेक्षक, घनकचरा व्यवस्थापन, शिवाजीनगर ऑफिस क्र. १, बृहन्मुंबई महानगरपालिका एम पूर्व वार्ड, गोवंडी, मुंबई ४३



Scanned with OKEN Scanner

यातील तक्रारदार श्री. जमील जलील खान, ४८ वर्षे, यांचा आज रोजी स्थानिक पातळीवर संगणकावर मराठीतून टंकलिखित केलेला जबाब हाच जादा गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(संजय प्रधान)
सहा. पोलिस आयुक्त
मा. गु. वि. मुंबई

Jamilkhan
12/05/2023
(Jamil Khan)

जबाब दि. १२/०५/२०२३

श्री.जमील जलील खान, वय ४९ वर्षे, धंदा-व्यवसाय :- सफाई कॉन्ट्रॅक्टर, जे. के. फाऊंडेशन, प्लॉट नं. ३६/एम लाईन/रू नं. ५, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई -४०० ०४३, रा.ठी :- ३६/एम लाईन/रू नं. ५, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई -४०० ०४३, मोबाईल क्र. ९८२१३००२३६, आधार कार्ड क्र.९०७७ ७३५० ४३३३

मी वरीलप्रमाणे असून उपरोक्त नमुद पत्त्यावर जन्मापासुन रहावयास आहे. माझी जे. के. फाऊंडेशन नावाची संस्था असुन माझे संस्थेमार्फत महानगर पालिका, मुंबई यांच्या अंतर्गत चालणाऱ्या साफ-सफाई चे कॉन्ट्रॅक्ट घेतो. सदरचे काम हे मला मी भरलेल्या टेन्डरव्दारे मिळतात. सदरच्या साफ- सफाई कॉन्ट्रॅक्ट मधुन मिळणा-या उत्पन्नतुन माझ्या कडे असणाऱ्या कामगारांना पगार देतो. तसेच माझे कुटंबांचा उदरनिर्वाह चालतो.

जे.के. फाऊंडेशन या माझे संस्थेमार्फत मुंबई महानगर पालिका वार्ड क्र.१३८- शिवाजी नगर चौकी क्र. १, घनकचरा व्यवस्थापन, बृहंन्मुंबई महानगरपालिका, एम(पुर्व), वॉर्ड, गोवंडी, मुंबई ४३ येथे मार्च व एप्रिल २०२३ या दोन महिन्यापासुन वार्डच्या अर्तगत येणाऱ्या विभागातील गटार- नाले, रस्ता व गल्ली मधील कचरा उचलणे तसेच साफ- सफाई करणे हि कामे केली आहेत. सदर केलेल्या कामाचे प्रति महिना रू. ७२,०००/- चे बिल तयार करून ते बिल बृहंन्मुंबई महानगरपालिका, एम(पुर्व), वॉर्ड, गोवंडी, मुंबई ४३ येथील कार्यालयात सादर करण्यापुर्वी शिवाजी नगर चौकी क्र. १, घनकचरा व्यवस्थापन, बृहंन्मुंबई महानगरपालिका, एम(पुर्व), वॉर्ड, गोवंडी, मुंबई ४३ मधील अधिकारी कनिष्ठ अवेक्षक(जेओ) श्री अशोक जाधव यांची सही घेणे आवश्यक असते. त्यामुळे मी दि. ०७/०५/२०२३ रोजी श्री अशोक जाधव यांचे वर नमुद कार्यालयात माझे कामाचे बिल त्यांचे स्वाक्षरीकरीता घेवुंन गेलो असता त्यांनी माझे कामाचे बिलावर स्वाक्षरी करण्याकरीता प्रति बिल रू. ५,०००/- प्रमाणे एकुण रू १०,०००/- लाचेची मागणी माझेकडे केली.

घन कचरा व्यवस्थापन खाते, शिवाजीनगर चौकी क्र.१, मनपा वार्ड- एम (पुर्व), गोवंडी, मुंबई येथील लोकसेवक श्री. अशोक जाधव, कनिष्ठ अवेक्षक(जेओ) यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई येथे दिनांक ११/०५/२०२३ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो व माझी लेखी तक्रार दिली. मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकरीता माझी तक्रार सहा. पोलीस आयुक्त संजय प्रधान व सहा. पोलीस आयुक्त प्रगती अडसुरे यांचेकडे देण्यात आली.

श्री. अशोक जाधव, कनिष्ठ अवेक्षक(जेओ) हे त्यांचे कार्यालयात दुपारी एक वाजेपर्यंतच हजर असतात त्यामुळे सपोआ संजय प्रधान यांनी माझे अर्जावर आज दि. १२/०५/२०२३ रोजी कारवाई करण्यात येईल असे सांगितले. त्यानुसार मी आज लाप्रवि, मुंबई कार्यालयात सकाळी १०.०० वाजता हजर राहिलो. सदरवेळी स.पो.आ. संजय प्रधान तसेच स.पो.आ अडसुरे मॅडम व दोन पंच ला.प्र.वि. कार्यालयात हजर होते. त्यानंतर सपोआ प्रधान यांनी दोन शासकीय पंचांशी व सपोआ अडसुरे यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर सपोआ प्रधान यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला.

त्यानंतर सपोआ प्रधान यांनी दिनांक १२/०५/२०२३ रोजी पंचांसमक्ष घन कचरा व्यवस्थापन खाते, शिवाजीनगर चौकी क्र.१, मनपा वार्ड- एम (पुर्व), गोवंडी, मुंबई येथील लोकसेवक श्री. अशोक जाधव, कनिष्ठ अवेक्षक(जेओ) यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला

Jamil
12/05/2023
(Jamil Khan)

Scanned with OKEN Scanner

डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

त्यानंतर सपोआ प्रधान यांनी आज रोजी पडताळणी/ सापळापुर्व/सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्यानंतर मला ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात नेऊन सपोआ प्रधान यांनी मला पडताळणी/सापळापुर्व/सापळाकारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर सपोआ प्रधान, माझे तसेच दोन्ही पंचाचे वक्तव्य घेण्यात आले.

त्यानंतर आम्ही ला.प्र. वि. कार्यालयाच्या बाहेर आलो. सपोआ प्रधान यांनी कार्यालयाबाहेर वाहनांसोबत उभ्या असलेल्या पडताळणी पथकाची आणि माझी ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघालो त्यावेळी १०.५० वाजले होते. शासकीय वाहनाने सी-लिंकवरून पुर्व द्रुतगतीमार्गे- शिवाजीनगर, गोवंडी येथे अब्दुररहमान मस्जीद व मदरसा समोर, महाराष्ट्र कंपाऊंड, घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, गोवंडी, मुंबई ४३ येथे शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला सपोआ प्रधान यांनी योग्य त्या सुचना देवुन घन कचरा व्यवस्थापन खाते, शिवाजीनगर चौकी क्र.१, मनपा वार्ड- एम (पुर्व), गोवंडी, मुंबई येथील लोकसेवक श्री अशोक जाधव यांचे कार्यालयात पडताळणीकरीता जाण्यापुर्वी डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. गलांडे यांचे सह पाठविले. त्यानंतर मी लोकसेवक श्री जाधव यांचे कार्यालयात त्यांना भेटण्याकरीता गेलो असता ते कार्यालयात उपस्थित होते. माझ्यामध्ये व लोकसेवकामध्ये माझे कामा संदर्भात चर्चा झाली. आमच्यामध्ये कामासंदर्भात चर्चा होवुन लोकसेवक यांनी माझेकडे दहा हजार रू. ची लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना अर्ध्या तासात पैसे घेवुन येतो असे सांगुन मी व पंच श्री. गलांडे शासकिय वाहनाजवळ आलो. त्यानंतर सदरचा डिजिटल रेकॉर्डर सपोआ प्रधान यांनी बंद करून स्वत:च्या ताब्यात घेतला. सदरचे डिजिटल रेकॉर्डचे स्पिकर ऑन करून पंच, सपोआ प्रधान व सपोआ अडसुरे यांच्या समक्ष माझे व लोकसेवक यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले. सदरचे संभाषण सुस्पष्ट ऐकु येत नसल्याने तसेच लोकसेवक श्री अशोक जाधव यांची लाचेची मागणी अस्पष्ट असल्याने सपोआ प्रधान यांचे सुचनेनुसार पुन्हा मला लोकसेवक जाधव यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. गलांडे यांचे सह पाठविले असता लोकसेवक जाधव हे कार्यालयात उपस्थित होते. माझ्यामध्ये व लोकसेवकामध्ये कामा संदर्भात चर्चा झाली. सदर लोकसेवक श्री जाधव यांनी पुन्हा माझेकडे रू. दहा हजार लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना थोडयाच वेळात पैसे घेवुन येतो असे सांगुन त्यानंतर मी व पंच श्री. गलांडे शासकिय वाहनाजवळ आलो. त्यानंतर सदरचा डिजिटल रेकॉर्डर सपोआ प्रधान यांनी बंद करून स्वत:च्या ताब्यात घेतला. सदरचे डिजिटल रेकॉर्डचे स्पिकर ऑन करून पंच, सपोआ प्रधान व सपोआ अडसुरे यांच्या समक्ष माझे व लोकसेवक यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले. सदर पडताळणीवेळी लोकसेवक यांची रू. दहा हजार लाचेची मागणी स्पष्ट झाल्याचे सपोआ प्रधान यांनी मला सांगितले. त्यानुसार सापळापुर्व व सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

त्यानंतर मला सपोआ प्रधान यांनी मी लाचेच्या सापळा कारवाई करीता लागणा-या रकमेबाबत माझेकडे विचारण केली असता ती शासकीस वाहन थांबलेल्या ठिकाणापासुन जवळच असलेल्या ए.टी.एम. मधुन काढुन आणलेली रक्कम रू. १०,०००/- (५००/- रू. दराच्या २० भारतीस चलानाच्या नोटा) सपोआ प्रधान यांच्या ताब्यात दिल्या. त्यानंतर सपोआ प्रधान यांनी सदर नोटांचे त्यांचे मोबाईलवर फोटो काढुन घेतले. त्यानंतर सदर रकमेमधील ५००/- रू. दराच्या २० नोटांना चालक सहा. फौ. जामसंडेकर यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावली. सपोआ प्रधान यांनी मला तसेच पंच गलांडे यांना अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. तसेच लोकसेवकाला लाचेची रक्कम दिल्यानंतर माझे डोक्यावरील टोपी काढुन लाचेची रक्कम

Jamil khan
12/05/2023
(Jamil khan)

Scanned with OKEN Scanner

स्विकारल्याबाबत इशारा करण्याबाबत मला सांगण्यात आले. तसेच सहा. फौ. जामसंडेकर यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावलेली सदर १०,०००/- रु लाचेची रक्कम माझे शर्टाचे खिशात ठेवली. त्यानंतर माझे शर्टाचे आत बनियानला पुन्हा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लावण्यात आला. त्यानंतर मला व पंच श्री गलांडे यांना लोकसेवक श्री जाधव यांचे कार्यालयात पाठविण्यात आले तसेच आमचे मागोमाग काही अंतर ठेवुन पोलीस पथक देखील लोकसेवकाचे कार्यालयाचे परिसरात येवुन थांबले.

घन कचरा व्यवस्थापन खाते, शिवाजीनगर चौकी क्र.१, मनपा वार्ड- एम (पुर्व), गोवंडी, मुंबई येथील लोकसेवक श्री अशोक जाधव यांचे कार्यालयात गेलो असता लोकसेवक जाधव हे कार्यालयात उपस्थित होते. माझ्यामध्ये व लोकसेवकामध्ये कामा संदर्भात चर्चा झाली. त्यांनी मला हाताच्या बोटांच्या इशाऱ्याने लाचेची रक्कमेची मागणी करुन ती रक्कम त्यांचे टेबलाच्या उजव्या बाजुकडील पहिल्या ड्रॉवर मध्ये ठेवण्यास सांगितले, म्हणुन मी माझे कडील अॅंथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम १०,०००/-(रु. ५००/- दराच्या २० भारतीय चलनी नोटा ) लोकसेवक यांनी सांगितल्याप्रमाणे लोकसेवक यांच्या टेबलाच्या उजव्या बाजुकडील पहिल्या ड्रॉवर मध्ये ठेवली. त्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यालयात असलेले एका इसमास बोलावले व एक सफेद कागद घेवुन येण्यास सांगितले. लोकसेवक यांनी सदर लाचेची रक्कम त्या इसमास सफेद कागदावर ठेवण्यास सांगितली व सदर लाचेची रक्कम त्या सफेद कागदात घडी घालुन त्यांच्या पॅन्टच्या मागिल बाजुच्या डाव्या खिश्यात लाचेची रक्कम ठेवली. त्यानंतर मी सदर कार्यालया बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझ्या डोक्यावरील सफेद टोपी काढुन सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी सपोआ प्रधान यांनी माझे बनियानला लावलेला व्हॉईस रेकॉर्डर काढुन तो बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर सपोआ प्रधान व सापळा पथाकातील पोलीसांनी लोकसेवक श्री अशोक जाधव यांचे कार्यालयात प्रवेश करुन त्यांस जागीच अटकावुन ठेवले त्यांनतर सपोआ प्रधान यांनी लोकसेवकाकडे त्यांच्याकडील लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता लोकसेवक जाधव यांनी त्यांच्या पॅन्टच्या मागील बाजुकडील डाव्या खिश्यातुन लाचेची रक्कम काढुन दिली. सपोआ प्रधान यांचे सुचनेनुसार सदर लाचेची रक्कम पंच श्री.बोडके यांच्या ताब्यात ठेवण्यास दिली. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक जाधव यांस रक्कम १०,०००/- (रु. ५००/- दराच्या २० भारतीय चलनी नोटा ) लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

सदर वेळी पोलिसांनी त्या लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव श्री. अशोक तानु जाधव, वय-५६ वर्षे, धंदा-नोकरी, पद -कनिष्ठ अवेक्षक,खाते घन कचरा व्यवस्थापन खाते, शिवाजीनगर चौकी क्र.१, मनपा वार्ड- एम (पुर्व), गोवंडी, मुंबई. रा.ठि. -८०३, साई प्रसाद आर्केड, सेक्टर -७, प्लॉट नं.२, कामोठे, नवी मुंबई असे असल्याचे मला,पंचांना व पोलिस पथकास समजले. त्यानतर नमुद लोकसेवक श्री जाधव यांचे हाताचे व त्यांचेकडुन ताब्यात घेण्यात आलेल्या लाचेच्या रकमेचे अल्ट्राव्हाईट प्रकाशात तपासले असता त्यांचे हातावर व तसेच नोंटावर अॅन्थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर लोकसेवक श्री अशोक जाधव यांनी पोलीस पथकाने ताब्यात घेवुन मनपा वार्ड- एम (पुर्व) कार्यालय, गोवंडी, मुंबई येथील त्यांचे वरिष्ठांना माहिती देवुन पुढील कार्यवाही करीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, वरळी, मुंबई येथे घेवुन आले.

मी जे.के . फाऊडेशनच्या मार्फतीने मुंबई महानगर पालिकेच्या शिवाजीनगर चौकी क्र.१, मनपा वार्ड- एम (पुर्व), गोवंडी, मुंबई. या विभागातील गटारे, नाले,रस्ता व गल्ली ची साफ-सफाई करण्याचे काम करतो. माहे मार्च २०२३ चे रू.७२,०००/-चे बिल व माहे एप्रिल २०२३ चे रू.७२,०००/-चे बिल अशी दोन बिले मुंबई महानगरपालिकेकडे बाकी आहेत. सदर बिलावर लोकसेवक श्री अशोक जाधव यांच्या सहया झाल्यानंतर सदरची बिले मनपा वार्ड- एम (पुर्व),

Jamil Khan
12/05/2023
( Jamil Khan )

Scanned with OKEN Scanner

गोवंडी, मुंबई. येथील कार्यालयात मंजुरी करीता पाठविण्यात येतात. सदर पेंडीग बिलांची रक्कम मंजूरी करण्याकरीता खाते - शिवाजीनगर चौकी क्र.१, मनपा वार्ड- एम (पुर्व), गोवंडी, मुंबई. येथील लोकसेवक श्री. अशोक तानु जाधव, कनिष्ठ अवेक्षक यांनी माझेकडे दि. १२/०५/२०२३ रोजी पडताळणी / सापळापुर्व/ सापळा दरम्यान रू. १०,०००/- लाचेची मागणी करून ती स्वत:करीता स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक अशोक तानु जाधव यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझा वरील जबाब हा मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून त्याची प्रिंटरद्वारे प्रिंट काढुन तो मला वाचुन हिंदी व मराठीतुन समजावुन सांगितला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( संजय सुरेश प्रधान ),
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Jamilkhan
12/05/2023
(Jamil Khan)

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे निरंक

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

[illegible]

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

श्री. संजय प्रधान, सहा. पो. आयुक्त

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P. S. ........

District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature] 12/05/2023

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name श्री. संजय प्रधान

पदनाम Rank सहा. पो. आयुक्त

तपासिक अं. चा कोड क्र.

Posting [illegible] मुंबई

Code No. of I. O.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, [signature] 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner